सामाजिक दुष्प्रवृत्तींचे निर्मूलन आणि स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी

सुराज्य

# सुराज्य अभियान

('हिंदु जनजागृती समिती'चा समाजकल्याणकारी उपक्रम)

मुख्य कार्यालय : 'ए / जी ४', सुखठणकर स्ट्रीट, चित्तार भाट, नागेशी, बांदोडा, फोंडा, गोवा – ४०३ ४०१. ✆ ७७३८२३३३३३, socialchange.n@gmail.com

दिनांक : 10|08|2023

प्रति,

मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. आरोग्य मंत्री,
महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. सचिव,
आरोग्य मंत्रालय,
महाराष्ट्र शासन.

मध्यवर्ती टपाल केंद्र
मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
आ.क्र.......(18)......
10|8|2023

**विषय – राज्यात अपघातात होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्यभरात अकार्यान्वित असलेली ट्रॉमा केअर सेंटर तातडीने सुरू करण्याबाबत**

महोदय,

हिंदु जनजागृती समितीच्या '**सुराज्य अभियान**'च्या अंतर्गत आजपर्यंत समाहिताची विविध अभियान राबवण्यात आली आहेत. खासगी प्रवासी बसचे भरमसाठ तिकीट दर नियंत्रित करावेत यासाठी मागील ४ वर्षांपासून अभियान राबवले जात आहे. याच्या पाठपुराव्यामुळे मोटार वाहन विभागाच्या संकेतस्थळावर नागरिकांना तक्रारीसाठीचे अनेक महिने बंद असलेले 'अ‍ॅप' आणि 'लिंक' पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी सरकारने आदेश काढला आहे. राज्यातील काही पालिका-महानगरपालिकांनी कर्मचाऱ्यांना 'अ‍ॅड्व्हांसेस' (तसलमात) म्हणून दिलेल्या लाखो रुपयांची मागील अनेक वर्षांपासून वसुली झाली नसल्याचा अपहार सुराज्य अभियानाने माहिती अधिकाराचा उपयोग करून उघड केला. ही वसुली होण्यासाठी दिलेल्या लढ्यामुळे आतापर्यंत कोल्हापूर, लातूर आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील रखडलेली लाखो रुपयांची वसूली झाली आहे. इतरही ज्या महानगरपालिकेची वसूली रखडली आहे त्याविषयी अभियानाच्या अंतर्गत कायदेशीर लढा चालू आहे. प्रवाशांना शुद्ध पेयजलासाठी असलेले रेल्वे फलाटावरील 'वॉटर वेन्डिंग मशीन' पुन्हा चालू करण्यासाठी प्रयत्न करणे, पेट्रोल आणि खाद्यपदार्थ यांतील भेसळीविरुद्ध जनजागृती, कचरा व्यवस्थापनासाठी रुग्णालयांना सक्ती करण्याची मोहीम, याविषयी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार करणे, सरकारी रुग्णालयांतील भ्रष्टाचाराच्या विरोधात तक्रारी करणे इत्यादी विषयांचा समावेश आहे.

सध्या राज्यभरातील रस्ते अपघातात झालेली वाढ हा एक गंभीर विषय आहे. 2023 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनेक लोकप्रतिनिधींनी याबाबत तारांकित प्रश्नांद्वारे मुद्दा सदनात उपस्थित केला होता. मा. उपमुख्यमंत्री यांनी प्रश्नातील आकडेवारी मान्य केली आहे. ती आकडेवारी अत्यंत गंभीर असून गेल्या दोन वर्षात साधारणपणे 60 हजार रस्ते अपघात झाले आहेत व त्यामध्ये 27 हजार प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, तर 2021 आणि जानेवारी ते नोव्हेंबर 2022 या काळात साधारण 48 हजार प्रवासी जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. ही आकडेवारी अत्यंत गंभीर आहे.

लिपिक
प्राप्त 10.08.2023
सार्वजनिक आरोग्य व
कुटुंब कल्याण यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२